## प्रकरण पहिले

# मराठी कादंबरी

# प्रकरण पहिले

## मराठी कादंबरी :-

मराठी साहित्यातील एक समृद्ध दालन म्हणजे मराठी कादंबरीचे विश्व होय. मानवी जीवनातील सुख-दु:ख टिपण्यासाठी कथा-काव्यापेक्षा कादंबरीचा विस्तृत असा पट योग्य ठरतो असे लक्षात आल्याने अनेकांनी कादंबरी हा वाङ्मयप्रकार हाताळला आहे. तत्कालीन समाजजीवनाचे यथार्थ दर्शन घडविण्याचा यशस्वी प्रयत्न लेखकांनी केला आहे. सामाजिक आणि राष्ट्रीय पातळीवर ज्या घडामोडी झाल्या त्याचे चित्रणही आपणास मराठी कादंबरीच्या अंतरंगात पाहावयास मिळते. अद्‌भुत कादंबऱ्या, सामाजिक समस्या हाताळणाऱ्या कादंबऱ्या, ऐतिहासिक कादंबऱ्या, राजकीय प्रश्नांना वाचा फोडणाऱ्या कादंबऱ्या, ग्रामीण जीवन रेखाटणाऱ्या कादंबऱ्या, कौटुंबिक समस्यांचे चित्रण करणाऱ्या कादंबऱ्या, चरित्रात्मक कादंबऱ्या अशा अनेक पदरांनी युक्त असलेले 'मराठी कादंबरी विश्व' मनाला भुरळ घालते.

कादंबरीला आज एक प्रधान वाङ्मयप्रकार म्हणून जागतिक मान्यता व लोकप्रियता लाभलेली असली तरी तिचा विकास प्रथमत: पाश्चात्य देशांमध्येच झाला. ह्या देशातही नाटक आणि कविता ह्या वाङ्मय प्रकारांप्रमाणे तिला शतकानुशतकांची दीर्घ अशी परंपरा नाही. खऱ्या अर्थाने अठराव्या शतकातच तिचे रूप उत्क्रांत झाले आणि एकोणिसावे शतक उलटण्यापूर्वीच एक प्रधान साहित्यप्रकार म्हणून ती वाङ्मयविश्वात प्रतिष्ठित झाली.

मानवी जीवन व्यवहाराचे कोणतेही रूप आविष्कृत करण्याची क्षमता कादंबरीमध्ये का आहे याचा विचार करता 'व्यक्ती' हा कादंबरीचा केंद्रबिंदू आहे. वास्तव सृष्टीत व्यक्तीला जी परिमाणे तिच्या मनाचे असो, बुद्धीचे असो, आयुष्याचे असो, प्रदेशाचे असो, निसर्गाचे असो, काळाचे असो, समाजाचे असो वा अन्य कोणत्याही अंगाचे असो 'व्यक्ती' ला असणाऱ्या अशा अनेक परिमाणांचा उपयोग करण्याची क्षमता केवळ कादंबरीतच असल्यामुळे मानवी जीवन व्यवहाराचे कोणतेही रूप ती मूर्त करू शकते.

कादंबरी हाच एक वाङ्‌मयप्रकार असा आहे की ज्यामध्ये 'व्यक्ती' ला असणाऱ्या अनेकविध परिमाणांचा साकल्याने उपयोग्य करता येतो. 'महायुद्धा' सारख्या व्यापक ऐतिहासिक घटनेपासून तो व्यक्ती-व्यक्तींमधील नाजूक भावसंबंधाचा अंतर्भाव असणारे कोणतेही अनुभवविश्व कादंबरीच्या पटावर चित्रित करता येते.

**कादंबरीचा उदय :-**

कादंबरी हा साहित्यप्रकार जरी आधुनिक असला तरी त्याचे बीज फार पुरातन आहे. गोष्टीवेल्हाळपणा हा मानवाचा एक स्वाभाविक विशेष आहे. भारतीय मानवांच्यातही तो तितकाच प्रामुख्याने दिसून येतो त्याला जे आश्चर्यकारक निसर्गविषयक अनुभव आले ते त्याने वेदांतील कथांमध्ये व अद्‌भुत कथांमध्ये ग्रंथित केले. आपले जीवनविषयक आदर्श त्याने रामायण, महाभारत यांसारख्या महाकाव्यांत चित्रित केले. अद्‌भुतांचे आकर्षण व आदर्शांचे चित्रण हे या प्रारंभीच्या कथावाङ्‌मयाचे मुख्य विशेष आहेत. केवळ करमणुकीसाठी म्हणून ज्या गोष्टी सांगितल्या गेल्या त्यातही या दोन प्रवाहांचे, अद्‌भुतांचे व आदर्शांचे मिश्रण दिसून येते. गुणाढ्याची 'बृहत्कथामंजिरी' वा सोमदेवाचा 'बृहत्कथासरित्सागर' यासारख्या ग्रंथांमध्ये हे मिश्रण स्पष्टपणे दिसून येते.

रामायणातील राम, लक्ष्मण, सीता यांच्या चरित्रांच्या नमुन्यावर व परस्परसंबंधाच्या कल्पनेवर गुणाढ्याने आपल्या नरवाहनदत्त, गोमुख, मदनमंचुका इत्यादींची कथा रचली व तिच्या उठावासाठी केवळ लोककल्पनेतून उद्‌भवलेल्या अशा विद्याधरांच्या अद्‌भुत उपकथांची तिला जोड दिली. लहान मुलांसाठी रचलेल्या, आजीबाईच्या मुखावाटे परंपरागत चालत आलेल्या नवलकथा, यक्षकिन्नरांच्या गांधर्वकथा, गावच्या वेशीवरच्या भुता-राक्षसाच्या लोकाचारविषयक ज्ञानाच्या कहाण्या, व्यवहारचातुर्याची दीक्षा देणाऱ्या नीतिकथा अशा कितीतरी कथाप्रकारांमध्ये हे दोन्ही प्रवाह एकत्रित आलेले दिसून येतात. अशा कथांचे फार थोडे अवशेष आज उपलब्ध आहेत. काळाच्या प्रवाहांत व बदलत्या जीवनाच्या ओघांत

कितीतरी वाहून गेले. परंतु जे काही आढळतात त्यावरून एवढे अनुमान मात्र निश्चितपणे काढता येते की अशा कथांचा विस्तार सगळीकडे पसरला होता. प्रत्येक लोकभाषेत त्यांची रूपांतरे अवतरली होती व त्यांचा लोकजीवनाशी जवळचा संबंध होता.

**'कादंबरी' या शब्दाचा उल्लेख :-**

एका विशिष्ट तऱ्हेच्या कल्पित कथेला कादंबरी हे नाव मराठीमध्ये बऱ्याच आधीपासून रूढ असावे. १८२९ मध्ये प्रसिद्ध झालेले 'महाराष्ट्र भाषेचा कोश' या ग्रंथात 'कादंबरी' या शब्दाचा तसा अर्थ दिला आहे. मराठी भाषेचे साहित्य जमवावे, कोश निर्माण करावे, व्याकरण रचावे, सर्व तऱ्हेचे संदर्भ ग्रंथ तयार करावे अशा नव्या उत्साहाची लाट उसळली. त्याच उत्साहाच्या काळात मुंबईच्या सुप्रिम कोर्टाचे चीफ ट्रान्सलेटर हरि केशवजी यांनी कादंबरी हे नाव ज्याला शोभून दिसेल असा पहिला मराठी ग्रंथ प्रसिद्ध केला. तो म्हणजे 'यात्रिकक्रमण' अथवा बनियनच्या 'पिलग्रिम्स प्रोग्रेस' या ग्रंथाचे भाषांतर. हे भाषांतर सरस उतरले असले तरी मूळ पुस्तकाचे वातावरण, वृत्ती व आशय सर्वच महाराष्ट्र धर्माला व महाराष्ट्र समाजाला परकेच आहे.

कादंबरी हा साहित्यप्रकार आधुनिक असला तरी त्याचे बीज फार जुने आहे. समाज जीवनाशी व्यापक नाते जोडणारा असा हा वाङ्मयप्रकार आहे. या वाङ्मयप्रकाराचे स्वरूप विस्तृत व सखोल आहे. कादंबरी सदृश्य गद्य कथात्मक साहित्य महाराष्ट्रात अकराव्या शतकात लीळाचरित्रांच्या रूपाने निर्माण झालेले आहे. लीळाचरित्रामध्ये छोट्या छोट्या कथा गुंफलेल्या असून म्हाइंभटांनी चक्रधरांची जीवनकथा सलग तीन विभागात वर्णन केली आहे. आजच्या कादंबरी वाङ्मय प्रकाराची वैशिष्ट्ये आपणास 'लीळाचरित्रा' मध्ये दिसतात.

निरनिराळ्या काळात लोकांच्या कादंबरीविषयीच्या अपेक्षा भिन्न भिन्न आहेत. कादंबरीचे स्वरूप कसे असावे यासंबंधी अनेक लेखकांनी आपले विचार मांडले आहेत. तर काहींनी कादंबरी या वाङ्मयप्रकाराला 'जीवनाचा आरसा' असे संबोधले आहे.

**कादंबरीची व्याख्या :-**

१) पाश्चात्य कादंबरीचा जनक फील्डिंग याच्या मते "गंभीर वातावरण नसलेले गद्य महाकाव्य"[१] म्हणजे कादंबरी होय.

२) "सत्यसृष्टीच्या आधाराने काल्पनिक प्रतिसृष्टी निर्माण करून काल्पनिक पात्रांची स्वभावचित्रे व काही अंशी तदवलम्बित जीवित-घटना यांचे गोष्टीरूपाने वर्णन करून व कलानंदाची प्राप्ती करवून जीवितातील गुंतागुंतीच्या प्रश्नावर प्रकाश टाकणारा गद्यवाङ्मयविभाग म्हणजे कादंबरी होय."[२]

३) मनोविश्लेषणास प्राधान्य देणारे टीकाकार कादंबरीची व्याख्या "हृदयांतरंगाचे आविष्करण" अथवा "मानवी हृदयाचा सूक्ष्म कलात्मक अभ्यास" अशी करतात. तर काही टीकाकार "आकर्षक कथानक हाच कादंबरीचा आवश्यक घटक होय"[३] अशी व्याख्या करतात.

४) "ज्यात सर्व काही सामावेल अशी गारूड्याची थैली"[४] ही एच्.जी. वेल्सने कादंबरीची व्याख्या केली आहे.

५) एम. ॲबेल चेव्हेली या फ्रेंच लेखकाच्या मते "जिला काही विस्तार आहे अशी गद्य कल्पित कथा म्हणजे कादंबरी होय."[५]

६) मा.का. देशपांडे यांच्या मते "कादंबरी म्हणजे जीवनाचे विस्तृत व कलात्मक गद्य चित्र होय."[६]

७) न्यू इंग्लिश डिक्शनरीकार यांच्या मते "भरपूर विस्तार असलेली मानवी जीवनातील व्यक्ती व त्यांच्या कृतीचे कथानकातून दर्शन घडविणारी काल्पनिक गद्य गोष्ट किंवा कथा म्हणजे कादंबरी होय."[७]

८) प्रेमचंद यांच्या मते "मैं उपन्यास को मानव चरित्र का चित्र समझता हूँ। मानव चरित्र पर प्रकाश डालना और उसके रहस्यों को खोलना ही उपन्यासों का मूलतत्त्व हैं।"[८]

निरनिराळ्या लेखकांच्या हाती कादंबरीने इतकी भिन्न भिन्न रूपे धारण केली आहेत आणि तिच्यामध्ये इतके विषय व तंत्र यांचे वैचित्र्य किंवा विविधता आली आहे की, कादंबरीची सुटसुटीत व्याख्या करणे अशक्यच आहे. एका बाजूला करमणूक व विनोद हेच ध्येय ठेवून हास्यरसाचे कल्लोळ उठविणारे 'पिक्‌विक् पेपर्स' किंवा 'चिमणरावांचे चऱ्हाट' व दुसरीकडे संसारातील दु:खी, कष्टी व नैराश्यमय जीवनाचे वर्णन करून गांभीर्य व उदासिनता यांच्या वातावरणाने आधीच त्रस्त झालेल्या मनास अधिकच विषण्ण करणारे हार्डीच्या 'टेस्' सारखे किंवा शरच्चंद्रांच्या 'देवदास' सारख्या कादंबऱ्या एका बाजूला कलेकरिता कला ह्या ध्येयाने प्रेरित होऊन लिहिलेल्या प्रा. फडक्यांच्या भोजनोत्तर वामकुक्षीच्या वेळी सुखाल्हाद देणाऱ्या प्रणयरंजित कल्पनारम्य कादंबऱ्या, तर दुसऱ्या बाजूला प्रचार हेच कलेचे ध्येय ठेवून 'वाचकांच्या हृदयात जखम करण्या' च्या उद्देशाने लिहिलेली 'धावता धोटा', 'विधवाकुमारी' यांसारखी पुस्तके. एका बाजूला महाराष्ट्रातील घरगुती चित्रे कोमल हाताने रंगविण्याचे हरिभाऊंचे प्रयत्न तर दुसरीकडे भयानकाचा विलास करून वाचकांनी मने उद्‌विग्न व भीतिग्रस्त करणारी 'कालिकामूर्ती', 'वीरधवल' यांसारखी अद्‌भुतघटनामय व रोमांचकारी पुस्तके या सर्वांचा समावेश एकाच कादंबरीक्षेत्रात झालेला आहे. ध्येय व वातावरण याप्रमाणेच तंत्रदृष्ट्याही कादंबरीच्या रचनेचे अनेक प्रयोग केलेले आढळतात. त्यामुळे असा भिन्न स्वरूपाचा कादंबरीचा पसारा पाहिला म्हणजे कादंबरीची सुटसुटीत व्याख्या करणे कठीणच आहे, असे म्हणावे लागते.

इंग्रजी राजवटीने या देशात जसे सामाजिक व भौतिक परिवर्तन घडवून आणले तसा भारतीय साहित्यावरही इंग्रजी साहित्यांचा प्रभाव पडला. शिक्षणप्रसार व मुद्रण कलेचाही विकास झाला. त्यामुळे वाचकांच्या संख्येत वाढ झाली. तसेच जीवनाचे नवोन्मेष व्यक्त करण्याची जी आवश्यकता निर्माण झाली ती पूर्ण करण्याचे कार्य कादंबरी वाङ्मयाने केले. असे असले तरी मदन कुलकर्णी लिहितात - ''कादंबरी हा वाङ्मय प्रकार म्हणून पाश्चात्य असला तरी 'कादंबरी' हा शब्द मात्र अस्सल भारतीय आहे.''[१]

कादंबरीला सत्यसृष्टीचा आधार असतो पण सत्यसृष्टीचे दर्शन घडविताना लेखकाला स्थळ, काल, प्रसंगादी बाबतीत विशेष लक्ष देऊन निवड करावी लागते. एका कादंबरीत लेखक फार तर काही व्यक्ती आणि त्यांच्या जीवनातील काही प्रसंगाच्या घटनांच्या आधारेच आपली कृती निर्माण करतो. त्यामुळेच बापट प्र.वा., गोडबोले ना.वा. लिहितात ''सत्यसृष्टीचे सम्यकदर्शन घडविण्यासाठी रटाळ जीवनातील सर्वच प्रसंगाचे जो वर्णन करील त्याची कादंबरी नीरस ठरेल.''[१०]

ना.सी. फडके यांनी ''एखाद्या व्यक्तीची इच्छा अनेक अडीअडचणीतून अनेक संकटातून मार्ग काढून कशी सिद्धीस गेली अगर कशी मोडतोड झाली याची कहाणी म्हणजे कादंबरी.''[११] अशी कादंबरीची व्याख्या केली आहे. कादंबरी म्हणजे केवळ इच्छापूर्तीचे कथन नव्हे त्याहूनही अधिक असे काही कादंबरीत असते. परंतु त्याचा विचार या व्याख्येत नाही. त्यामुळे ही व्याख्या परिपूर्ण वाटत नाही.

जे.बी. प्रिस्टले यांनी ''काल्पनिक पात्रे व घटना यांचा परामर्श घेणारा गद्य कथाप्रकार''[१२] अशी कादंबरीची व्याख्या केली आहे. या व्याख्येत कादंबरीच्या कथात्मकता आणि निवेदनात्मकता या घटकांबरोबरच पात्रे व घटना या महत्त्वाच्या घटकांचाही निर्देश आला आहे. तथापि कादंबरीची सर्वमान्य अशी व्याख्या कोणीही करू शकलेले नाही. कारण बदलत्या काळाप्रमाणे कादंबरीच्या स्वरूपात बदल झालेले दिसून येतात. एक बाब लक्षात घेतली पाहिजे ती अशी की कादंबरीतून चित्रित होते ते प्रामुख्याने मानवी मन, मानवी जीवन. परंतु माणूस प्रत्यक्षात जगत असलेले जीवन आणि कादंबरीतील जीवन यातील भेद लक्षात घेतला पाहिजे. प्रत्यक्ष जीवनातील अनेकविध घटकांच्या पसाऱ्यातून लेखक काही निवड करीत असतो. कादंबरीत चित्रित होणारे जीवन प्रत्यक्षातील जीवन नसते हे खरेच. परंतु ते जीवनासारखे असते जीवनाशी संवादी असते. म्हणूनच प्रत्येक चांगल्या कादंबऱ्यातून आपणास जीवनाचा प्रत्यय येत असतो.

कुसुमावती देशपांडे लिहितात, ''पार्थिव संसाराविषयीची आस्था ही कादंबरीची वृत्ती. जीवनाचे कानेकोपरे चौकसपणे धुंडाळणे, तत्त्वदर्शित्वाचा किंवा अद्‌भुताचा मार्ग धरून मूलत: मानवी मनाचा विचार करणे हा कादंबरीचा दृष्टिकोन. जीवनविषयक अनुभव वा कल्पना हा कादंबरीचा मूळ आधार किंवा तिची मुख्य सामग्री. ही वृत्ती, हा दृष्टिकोन, हे अनुभव वा कल्पना जिवंत व्यक्तिचित्रांच्या व एका विस्तृत आकर्षक कथानकाच्याद्वारे व्यक्त करणे ही कादंबरीची पद्धती.''[१३]

गंगाधर गाडगीळ यांनी म्हटले आहे की, ''कादंबरीची रचना संघराज्यासारखी असते. कादंबरीमध्ये अनेक केंद्रे असतात. वेगवेगळ्या घटकांतून रचलेल्या अनुभवांच्या अनेक स्वायत्त संघटना असतात. या संघटना परस्परबद्ध असतात. पुष्कळदा तिच्यातील भिन्न कथासूत्रे परस्परांच्या प्रगतीला मदत करतात. मात्र असे नेहमीच असते असे नाही. कधी कधी या भिन्न कथासूत्रांतील पात्रांचा आणि त्यांच्या कृतींचा व्यावहारिक संबंध अत्यल्प असतो, गौण असतो अगर मुळीच नसतो. पण ते काही असले तरी कोणत्याही कादंबरीतील या स्वायत्त अनुभव संघटनांचा परस्परांशी कलात्मक संबंध मात्र निश्चित असतो.''[१४]

कादंबरीची सर्वसमावेशक आणि नेमकी अशी व्याख्या करण्याचा प्रयत्न भालचंद्र नेमाडे यांनी केला आहे. त्यांच्या मते, ''कादंबरी म्हणजे प्रदीर्घ भाषिक अवकाश असलेली आशयसूत्राचे अनेक पदर असलेली, त्यामुळे विस्तृत संरचना मांडणारी, अनेक पात्रे, प्रसंग, अपूर्णतेपेक्षा संपूर्णतेकडे जास्त झुकलेले आहेत अशी साहित्यकृती असते. कादंबरीच्या या सर्व गोष्टीमुळे एखादी मोठी कृती साकल्याने मांडता येते. सामाजिक आशय विशाल असावा लागतो. एखाद्या समस्येचा पाठपुरावा तिच्या विविध संदर्भासहित मांडलेला असतो. संस्कृतीचे.... तपशीलासह दर्शन घडविलेले असते. संपूर्ण काळाचा किंवा समाजाचा छेद घेतलेला असतो. आशयसूत्रे बळकट असतात. पात्रे सलग उभी असतात.''[१५]

नेमाडेंच्या या व्याख्येमध्ये कादंबरीच्या अनेकविध वैशिष्ट्यांचा समावेश आहे. ही व्याख्या अत्यंत समर्पक व सार्थ आहे. म्हणूनच ती जास्तीत जास्त स्वीकारार्ह वाटते. कारण खंडिततेपेक्षा .... प्रसंगाच्या परिपूर्ण चित्रणांची आवश्यकता अधिक असते.

कादंबरीच्या कथाबीजाची प्रकृती एकदा निश्चित झाल्यानंतर सेंद्रिय एकात्मतेच्या तत्त्वानुसारच त्याचा विकास होत असतो. घटना, प्रसंग आणि व्यक्ती हे घटक परस्परांशी अतूट असा संबंध प्रस्थापित करूनच कथासूत्राला अपरिहार्यपणे पुढे पुढे खेचीत नेतात. म्हणजे कादंबरीच्या त्या घटकांमध्ये असा विकास घडवून आणण्याचे सामर्थ्य असावे लागते. कल्पित कथेत नेमके याउलट घडते. तेथे कथासूत्रात आंतरिकरित्या फुलण्याची शक्ती नसते. तिच्यातील घटना-प्रसंग आणि व्यक्ती केवळ गोष्टकर्ता सांगेल तसा आकार घेत असतात. म्हणूनच प्रा.श्री.मा. कुलकर्णी यांनी कादंबरीची दिलेली व्याख्या ''कार्यकारण शृंखलाबद्ध अशा कल्पित कथानकाच्या द्वारा मानवी जीवनाचे दर्शन घडविणारी सविस्तर ललितगद्य कथा म्हणजे कादंबरी''[१६] अपूर्ण वाटते. कारण या व्याख्येत घटनांच्या कार्यकारणभावाला महत्त्व दिलेले असून तो लावून दाखविणे महत्त्वाचे मानले आहे.

कादंबरी हे आपल्या काळाचे चित्र असते असे मानल्यानंतर तिच्यात सामाजिक जीवन आशयरूपाने येणे अपरिहार्य ठरते. सामाजिक वास्तव हेच कादंबरीचे आशयद्रव्य असते. व्यक्ती सामाजिक वास्तवात जगत असते. व्यक्ती-व्यक्तीचे परस्परांशी जे संबंध येतात त्यातच सामाजिकता असते. कारण व्यक्ती ही व्यक्ती म्हणून वेगळी नसून ती सामाजिक वास्तवाचा भाग असते. सामाजिकतेशिवाय व्यक्तीच्या जीवनाला अर्थपूर्णता लाभत नसते. म्हणून कादंबरीत व्यक्ती-कुटुंब-समाज असे संबंध रेखाटले जातात. कादंबरीत काही विशिष्ट व्यक्तींचे जीवन चित्रित होत असले तरी शेवटी त्यातून मानवी स्वभावच चित्रित झालेले असतात. अशा रीतीने तो मानवी मनाचाही शोध ठरतो.

सामान्यपणे लेखक कादंबरीच्या अनेक पद्धतींचा, रचना प्रकारांचा, तंत्रघटकांचा आवश्यकतेप्रमाणे उपयोग करून कादंबरीचा जीवनानुभव प्रभावीपणे व परिणामकारकपणे रेखाटण्याचा प्रयत्न करतो.

अशाप्रकारे कादंबरीच्या विविध व्याख्यांच्या आधारे कादंबरीची स्वभाववैशिष्ट्ये लक्षात येतात. त्यावरून कादंबरी हा वास्तवाधिष्ठित साहित्यप्रकार आहे असा निष्कर्ष आपणास काढता येतो.

**कादंबरीचा विकास :-**

इ.स. १८५० पर्यंत हिंदुस्थानात ब्रिटिश राजवटीचा एकछत्री अंमल सुरू झाला होता. ब्रिटिशांनी आपल्याबरोबर आपले वाङ्मयही हिंदुस्थानात आणले. त्यामागची कारणे कोणती का असेनात, पण भारतात शिक्षणाचा प्रसार करण्याचे धोरण स्वीकारले होते. त्यामुळे मध्यमवर्ग शिकू लागला. अनेक इंग्रजी शाळा, महाविद्यालये चालू केली. ज्ञानाची कवाडे उघडू लागली. त्यामुळे इंग्रजी वाङ्मयाचा अभ्यास काहीजण करू लागले. अशाच प्रकारचे वाङ्मय मराठीमध्ये का असू नये ? असा प्रश्नदेखील त्यांच्या मनात निर्माण होऊ लागला आणि त्यातूनच मराठी कादंबरीचा जन्म झाला.

मराठी कादंबरीच्या जन्मामुळेच 'कादंबरी' या वाङ्मयप्रकाराचा १८५० ते १८९० या काळात विविधांगी विकास झाला. उदा. वैचारिक, कलात्मक, प्रचारात्मक इ. या विकासासाठी अनेक कादंबरीकारांनी आपले योगदान दिले. यातूनच विकासाचे विविध टप्पे पाडण्यास सुरूवात झाली.

**१) १८८५ पूर्व (मराठी कादंबरीचा आरंभकाल) :-**

मराठी वाचक-लेखकांना 'कादंबरी' च्या अस्तित्वाची जाणीव झाली ती इ.स. १८१८ नंतर म्हणजे पेशवाई जाऊन इंग्रजांची राजवट आल्यानंतर. ह्या कालखंडात पाश्चात्य वाङ्मयाच्या परिचयाने आणि परिशीलनाने ऐतदेशीयांना नव्या-जुन्या अशा सर्वच

वाङ्मयप्रकारांच्या संदर्भात एक नवी जाण आणि जाग आली. कादंबरी हा साहित्यप्रकार पूर्णपणे नवा होता तरी त्याच्या कथात्मक रूपामुळे इकडेही तो लवकरच लोकप्रिय झाला. एवढेच नव्हे तर पाश्चात्य कादंबरीच्या धर्तीवर मराठी कादंबरीच्या निर्मितीचे प्रयत्न हळूहळू मूळ धरू लागले. या काळातील एकूण वातावरण कादंबरीच्या विकासाच्या दृष्टीने अनुकूल, प्रतिकूल अशा संमिश्र स्वरूपाचे होते. मुद्रणाची सोय उपलब्ध होती. मराठी गद्याचे अभिव्यक्ती सामर्थ्य दिवसेंदिवस वाढत होते. शिक्षणाच्या प्रसारामुळे वाचकांची संख्याही वृद्धिंगत होत होती. वाचनाची गोडी लागावी म्हणून शिक्षणक्रमात वाङ्मयाचा मुद्दाम अंतर्भाव केला जात होता. शिक्षणखाते देखील कथात्मक वाङ्मयाच्या अनुवादित, रूपांतरीत आणि स्वतंत्र निर्मितीला प्रोत्साहन देत होते. असे असले तरी या काळातील विद्वान, सुशिक्षित, प्रतिभासंपन्न व्यक्तींना कादंबरीच्या विकासात तितकेसे स्वारस्य नव्हते किंबहुना तिच्याविषयीचा त्यांचा ग्रह काहीसा प्रतिकूल स्वरूपाचा होता.

अशा परिस्थितीतदेखील काही मोजक्या सुशिक्षित मंडळींनी इंग्रजीतील लोकरंजक कथा, कादंबऱ्या आणि ऐतिहासिक कादंबऱ्या, रोमान्स इ. च्या धर्तीवर ग्रंथ लिहिण्याचे प्रयत्न केलेले आहेत. उदा. रा.भि. गुंजीकर-मोचनगड (१८७१), विनायक कोंडदेव ओक-शिरस्तेदार (१८८१), द्वा.ना. रणदिवे - शिक्षक (१८८३), रामकृष्ण बळवंत नाईक - काळपुरूष (१८८६) आणि नाहीच ना ऐकायचं ? (१८९२), गणेश महादेव लिमये - वेणू (१८८९), काशिबाई कानेटकर - रंगराव (प्रारंभ १८८६, पुस्तकरूप १९०३), केशव रामचंद्र केळकर - सिंधुबाई किंवा आजकालची सद्गुणी माणसे (भाग १ व २, १८९०-९१), बळवंत मनोहर पंडित - सुशील यमुना अथवा वासुदेव बळवंत फडके यांच्या बंडाची धामधूम (१८८७), शंकर विष्णु पुराणिक - देवी सत्यभामा (१८८६) इ. मराठीतील पहिली कादंबरी कोणती याविषयी मराठी अभ्यासकांच्या मध्ये दुमत असलेले आढळून येते. काही अभ्यासक विधवांच्या दु:स्थितीचे निरूपण करणाऱ्या बाबा पद्मनजींच्या 'यमुना पर्यटन' या कृतीला

पहिल्या कादंबरीचा मान देतात. तर काही अभ्यासकांच्या मते लक्ष्मणशास्त्री हळबे यांची 'मुक्तामाला' (१८८१) ही 'कल्पित गोष्ट' हीच मराठीतील पहिली कादंबरी ठरते. कादंबरीची कथावस्तू घटना-प्रसंगाच्या साहाय्याने केले जाणारे व्यक्तिचित्रण, वातावरणनिर्मिती, कादंबरीची भाषाशैली याबाबत मोचनगडकर्त्या गुंजीकरांची जाण बरीचशी प्रगल्भ होती. म्हणूनच मराठीतील पहिली ऐतिहासिक कादंबरी म्हणून नव्हे तर मराठीतील पहिली 'कादंबरी' म्हणून ह्या कृतीचाच उल्लेख करणे उचित ठरावे.

मराठी कादंबरीच्या विश्वातील या काळातील एक लक्षणीय घटना म्हणजे १८७२ मध्ये का.बा. मराठे यांनी लिहिलेला नावल व नाटक याविषयी निबंध. 'नावल' चे मुख्य गुण लक्षात घेण्याचा, तिच्या रचनेच्या संदर्भात मार्गदर्शक तत्त्वे नमूद करण्याचा त्यांचा प्रयत्न होता. तथापि वि.का. राजवाडे यांनी १९०२ मध्ये लिहिलेल्या कादंबरीवरील विस्तृत निबंधात तिच्या वैशिष्ट्यांची उकल अधिक मार्मिकपणे झालेली दिसते.

**२) हरिभाऊ आपटे यांचा कालखंड (१८८५ ते १९२०) :-**

विष्णशास्त्री चिपळूणकरांनी 'भाषापद्धती' ह्या निबंधात लिहिल्याप्रमाणे हरिभाऊंच्या आधीची मराठी कादंबरी 'कादंबऱ्या व नाटके ही सध्या यदृच्छेने जो तो हवी तशी लिहितो' अशाप्रकारे निर्मात्याच्या मर्जीनुसार दिशाहीन अवस्थेत आकार धारण करीत होती. कादंबरीची निर्मिती करू पाहणाऱ्या लेखकांना तिचे प्रयोजन नीटसे उमगलेले नव्हते आणि म्हणून तिच्या अभिव्यक्तीच्या संदर्भातील त्यांच्या जाणिवाही अस्पष्ट, धूसर होत्या. हरि नारायण आपटे (१८६४-१९१९) ह्यांनी पाश्चात्य कादंबरीच्या अंतरंगाशी सामरस्य साधून तिचे प्रयोजन, तिच्या निर्मितीचे घटक आणि तिच्या परिणामाचे मर्म अचूकपणे हेरले. आपण जे जीवन जगतो, जे अनुभव घेतो त्यातूनच वास्तववादी कादंबरी तिचा जीवनरस शोषून घेते. सभोवतालच्या वास्तवाचे यथातथ्य चित्रण करणे एवढेच मर्यादित उद्दिष्ट तिच्यासमोर नसते. अन्य साहित्यप्रकारांच्या तुलनेने कादंबरीचा फलक विस्तृत असल्यामुळे व्यक्तींच्या गतिमान,

SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

भरघोस आणि विविध स्वरूपांच्या जीवनप्रवाहांचे दर्शन ती सहजपणे घडवू शकते. व्यक्तिमनाबरोबरच समाजमनाची उकल करण्याचे सामर्थ्य तिच्या ठायी असते, नव्हे तिचे हे एक लक्षणीय वैशिष्ट्य आहे. हरिभाऊंजवळ कलावंताची संवेदनशीलता असल्यामुळे कादंबरीच्या ह्या अनेकविध वैशिष्ट्यांचे त्यांना आकलन होऊ शकले आणि म्हणूनच आपल्या कादंबरीची घडणही त्यांना अधिक जाणतेपणाने करता आली. पण लक्षात कोण घेतो ? (१८८३), वज्राघात (१९१५) ह्यासारख्या त्यांच्या कादंबऱ्यांनी अपघाताने वा योगायोगाने कलारूप धारण केलेले नाही. आपला देश, आपला समाज, आपली संस्कृती, आपल्या रूढी व परंपरा, आपला इतिहास, आपल्या समस्या, आपली जीवनमूल्ये ह्या सर्वांमुळे आपल्या जीवनाला येणारे रूप आपल्या कादंबरीविश्वाद्वारा म्हणजे 'आजकालच्या गोष्टी' व 'गतकालच्या गोष्टी' द्वारा साक्षात करण्याचा हरिभाऊंचा प्रयत्न आहे.

हरिभाऊंनी निर्माण केलेल्या कादंबरीच्या लेखनादर्शापासून दूर जाणारी कादंबरी ह्या काळात वाढली आणि झपाट्याने फोफावली. ती, कादंबरी वाचनासाठी उत्सुक बनलेल्या वाचकांच्या कादंबरी विषयक प्रचंड मागणीमुळे. पुढे मराठी कादंबरीच्या विकासातील एक महत्त्वाचा टप्पा म्हणून ना.सी. फडके (१८९४-१९७८) ह्यांचा निर्देश होऊ लागला. तो ह्याच घोटाळ्यामुळे. कादंबरीच्या हुकूमी निर्मितीसाठी तिचे रचनातंत्र देखील तितकेच हुकूमी असावे लागते. त्यावर लेखकाची पूर्ण पकड असावी लागते. ह्या काळात 'मागणी तसा पुरवठा' ह्या न्यायाने कादंबऱ्या लिहिणाऱ्या लेखकांनी नेमके हेच केले. म्हणूनच कादंबरीचा आशय कोणताही असला तरी तिचे रचनातंत्र सहसा बदलत नसे. नाविण्यासाठी जो काय थोडाफार बदल झाला असेल तेवढाच. हुकूमी परिणाम साधण्यासाठी ह्या काळात भावविवश चित्रणाला आणि अलंकृत भाषाशैलीला प्राधान्याने राबविण्यात आले.

### ३) फडके युग (१९२० ते १९५०) :-

ह्या आधीच्या कालखंडात मूळ धरलेल्या रंजक कादंबरीची वाढ याही कालखंडात सातत्याने चालू राहिली. एवढेच नव्हे तर तिला फार मोठी प्रतिष्ठाही प्राप्त झाली. कारण

रंजक कादंबरीकारांचे अग्रगण्य ना.सी. फडके हेच कलाजीवन वादातील 'कलेसाठी कला' ह्या पक्षाचे प्रमुख पुरस्कर्ते होते. वाङ्मयीन निर्मितीमागे प्रचारकी, बोधवादी स्वरूपाचे कोणतेही उद्दिष्ट असू नये, ही त्यांची भूमिका योग्य होती. मात्र कादंबरीच्या निर्मिती प्रक्रियेला त्यांनी जे यांत्रिक रूप दिले, त्यामुळे ती अचेतन निष्प्राण बनली. कादंबरीच्या अनेकविध घटकांचे मिश्रण आणि चित्रण तंत्रशुद्ध पद्धतीने फडके करू शकले. कारण त्यांना फक्त वाचकांचे मन आकर्षित करणारी 'देखणी' किंवा 'मोहक', वास्तवापासून दूर पण वास्तवसदृश्य, स्वप्नरंजनात्मक 'कादंबरी' च घडवायची होती. अशा कादंबरीचा त्यांनी तयार केलेला साचा विलक्षण प्रभावी ठरला. हे त्यांच्या जादूगार (१९२८), दौलत (१९२९), अटकेपार (१९३१) इ. अनेक कादंबऱ्यांना लाभलेल्या अमाप लोकप्रियतेवरून लक्षात येते.

ह्या कालखंडातील वाचकांच्या अभिरूचीने एक वैशिष्ट्य दिसते ते असे की, कलावादी ना.सी. फडके आणि जीवनवादी वि.स. खांडेकर (१८९८-१९७६) हे दोघेही त्यांचे सारखेच आवडते कादंबरीकार होते. एकीकडे फडक्यांची कुशल कारागिरी त्यांना मोहवीत होती तर दुसरीकडे खांडेकरांचा ध्येयवाद लोभवीत होता. कादंबरीने स्वप्नरंजनात्मक विश्वात गुंग न होता, प्रत्यक्ष सभोवतालच्या प्रखर वास्तवाला सामोरे व्हावे, त्याचप्रमाणे जीवन कसे असावे याचेही उद्‌बोधक चित्रण तिने करावे असे प्रामाणिपणे जाणवत असतानाही खांडेकरांची कादंबरी फडक्यांनी निर्माण केलेल्या लेखनसंकेतांना बळी पडली आणि तिच्या प्रकृतीत एक आंतरिक विरोध निर्माण झाला.

४) **१९५० ते १९७५ :-**

सर्वसामान्यपणे १९५० च्या आसपास मराठी कादंबरीच्या निर्मितीमागील प्रेरणांमध्ये पुन्हा काही महत्त्वाचे फेरबदल घडले. श्री.ना. पेंडसे, व्यंकटेश माडगूळकर, गो.नी. दांडेकर, उद्धव शेळके असे जे कादंबरीकार ह्या सुमारास उदयाला आले त्यांच्यासमोर फडके युगातील कादंबरीचे लेखनादर्श नव्हते. ह्या कादंबरीकारांची व्यक्तित्वे ज्या प्रदेशात घडलेली होती तो

प्रदेश त्यांच्या अनुभवविश्वाचा एक अविभाज्य घटक बनला होता. आपल्या कादंबरीद्वारा ह्या अनुभवविश्वाची प्रामाणिक अभिव्यक्ती करण्याचा प्रयत्न त्यांनी केल्यामुळे विशिष्ट प्रदेश अगदी सहजपणेच त्यांच्या कादंबरीविश्वाचाही घटक बनला आणि श्री.ना. पेंडसेकृत - हद्पार (१९५०), गारंबीचा बापू (१९५२), व्यंकटेश माडगूळकर - बनगरवाडी (१९५५), दांडेकर पडघवली इ. कादंबऱ्या जन्माला आल्या. फडके युगातील कादंबरीच्या साचेबंद रूपाची जाणीव अशाप्रकारे बरीचशी विरल्यामुळे ह्या कालखंडातील मराठी कादंबरीला मुक्त वातावरणात स्वतःच्या वेगवेगळ्या रूपांचा शोध घेणे शक्य झालेले आहे. ह्याचा अर्थ पलायनवादी, स्वप्नरंजनात्मक उदात्तीकरणाच्या प्रेरणेतून जन्माला आलेल्या कादंबऱ्यांचे आकर्षण पूर्णपणे संपुष्टात आलेले आहे असे नाही. थोरले माधवराव पेशवे यांच्या जीवनावर लिहिलेल्या रणजित देसाई ह्यांच्या 'स्वामी' (१९६२) ह्या कादंबरीला जी अमाप लोकप्रियता लाभली तिचे इंगित माधवरावांच्या उदात्त प्रतिमेत आणि रमा-माधवरावांच्या कल्पनारम्य चित्रणातही आहे. या कादंबरीनंतर इतिहासातील व्यक्तिरेखांवर आधारलेल्या कादंबऱ्यांची (उदा. झेप १९६३, झुंज १९६६) लाट उसळली, इतिहासाप्रमाणेच व्यक्तींच्या चरित्रांवर आधारलेल्या कादंबऱ्यांचाही एक गट आता तयार होऊ लागला. श्री.ज. जोशी यांच्या आनंदी-गोपाळ (१९६८) या कादंबरीला वाचकांचा चांगला प्रतिसाद लाभल्यामुळे या अशा चरित्रात्मक कादंबऱ्यांच्या निर्मितीला प्रेरणा मिळाली. १९५९ मध्ये वि.स. खांडेकरांची 'ययाती' कादंबरी अवतरली आणि पुराणांतरीच्या व्यक्तिरेखांकडे विशेषत: कर्णाकडे कादंबरीकारांचे लक्ष वेधले गेले. पौराणिक कथेला वर्तमानाच्या संदर्भात अर्थपूर्ण करण्याची प्रक्रिया अवघड असल्यामुळे तितक्याशा यशस्वी झालेल्या नाहीत. विज्ञान, भय यांच्यावर आधारलेल्या कथा-वाङ्मयात रंजनाचे सामर्थ्य असल्यामुळे काही कादंबरीकारांचा कल अशा कादंबऱ्यांच्या निर्मितीकडे झुकू लागलेला आहे.

मराठी कादंबरीच्या विकासाबाबत साकल्याने विचार करता असे म्हणावे लागेल की, उत्तुंग प्रतिभेच्या कादंबरीकारांचा अभाव अजूनही तीव्रतेने जाणवतो आहे, पण असे असले तरी सध्या अत्यंत संवेदनशील वृत्तीच्या तीव्र बुद्धिमत्तेच्या, धीटपणे कोणत्याही अनुभवाचे दर्शन घडवू शकणाऱ्या आणि जागतिक पातळीवरील वाङ्मयाच्या क्षेत्रातील विविध प्रवृत्ती-प्रवाहांची जाण असणाऱ्या कादंबरीकारांची संख्या हळूहळू वाढत असल्याने मराठी कादंबरीची अधिक मोठी आव्हाने पेलण्याचे सामर्थ्य वृद्धिंगत होत आहे.

**ऐतिहासिक कादंबरी :-**

मराठीमध्ये आजतागायत अनेक कादंबऱ्या लिहिल्या गेल्या आहेत. परंतु मराठीतील पहिली कादंबरी म्हणून बाबा पद्मनजी यांनी लिहिलेली 'यमुना पर्यटन' या कादंबरीचा उल्लेख केला जातो. यानंतर मराठी कादंबरीचा प्रवास अखंडपणे चालत राहिलेला दिसून येतो. मराठी कादंबरीमध्ये कादंबरीचे सामाजिक, दलित, ग्रामीण, प्रादेशिक, चरित्रात्मक, ऐतिहासिक कादंबरी असे अनेक प्रकार आपणास पाहावयास मिळतात.

प्रतिभावंताची अनुभूती आपले वैशिष्ट्यपूर्ण रूप धारण करून आविष्कृत होत असते. त्याच्या आविष्काराने स्वीकारलेल्या घाटावरून त्या ललितकृतीची प्रकृती समीक्षक निश्चित करीत असतात. कोणत्याही कलेच्या आविष्कारामागे एक तंत्र असते, शास्त्र असते, काही संकेत असतात. इतिहास, पुराण, महाकाव्य, चरित्र, बखर या गणगोताशी जवळीक असूनही ऐतिहासिक कादंबरी तशी निराळीच असते. तिला इतिहासाशी निष्ठा ठेवावीच लागते. साहित्याचा वाचकाच्या मनावर होणारा परिणाम लक्षात घेता इतिहास रूष्ट होणार नाही याबाबत ही निष्ठा जागरूकतेने सांभाळली जाते. तथापि ललित साहित्यकृतीच्या एकात्म परिमाणाच्या दृष्टीने ऐतिहासिक सत्य आणि लेखकाची सृजनशील कलात्मक कल्पकता ही दोन्ही परस्परपूरक आणि पोषक असणे आवश्यक असते. त्यामुळेच ऐतिहासिक कादंबरी हा एक वैशिष्ट्यपूर्ण वाङ्मयप्रकार म्हणावा लागतो.

**ऐतिहासिक कादंबरीची व्याख्या :-**

ऐतिहासिक कादंबरी हा इतिहास आणि साहित्य, म्हणजेच विज्ञान आणि कला या दोन परस्परविरोधात्मक तत्त्वांचा अद्‌भुतरम्य संगम असलेला असा साहित्यप्रकार आहे. ''ऐतिहासिक कादंबरी ही वाङ्मयातील संकर जात आहे. एका बाजूस ऐतिहासिक सत्याचा विपर्यास झाल्याबद्दल इतिहासकार तिला दोष देण्यास टपलेला असतो, तर दुसरीकडे प्रमाणाबाहेर इतिहास कादंबरीत आला म्हणजे ती नीरस होण्याची भीती असते.'' अशा शब्दांत लेस्ली स्टेफनने लेखकाला तारेवरील कसरतीप्रमाणे तोल सावरीत, दुहेरी जबाबदारी पेलीत ऐतिहासिक कादंबरीची निर्मिती करावी लागते, हे सांगितले आहे.

ऐतिहासिक कादंबरीतील वास्तव हे भूतकालीन जीवनातील अनेक प्रकारच्या गतिमानतेसह व्यापक आणि गुंतागुंतीच्या स्वरूपामध्ये व्यक्त झालेले असले पाहिजे. कादंबरीच्या निर्मितीमागील प्रेरणा वास्तव जगाशी संबंधित असाव्यात, पण तिच्यातील अनुभवाची क्षितिजे विस्तारणारी हवीत. स्थूलमानाने कादंबरी हा वाङ्मयप्रकार जीवनातील सर्व म्हणजे वैज्ञानिक, धार्मिक, सामाजिक, तात्त्विक इ. सर्वच अनुभवांना सामावून घेणारा आहे. जीवनातील सर्व अंत:प्रवाह व्यक्त करण्यासाठी वास्तव जगाचा-प्रत्यक्ष जीवनसृष्टीचा आधार त्याला सत्यदर्शनासाठी घ्यावा लागतो. मात्र कादंबरीच्या आंतरिक विश्वात कोणत्या तत्त्वाधारे हा विषय सामावलेला आहे याला अधिक महत्त्व आहे. या संदर्भात वि.का. राजवाडे यांचे विचार चिंतनीय आहेत. ते म्हणतात - ''आता कादंबरीचे म्हणून एक निराळेच सदर काढीत असतात, परंतु तसे करण्याचे काही एक कारण नाही. ऐतिहासिक हा जर कादंबऱ्यांचा एक निराळाच भाग समजला तर नैतिक, शास्त्रीय, प्रावासिक, प्रेमळ, राजकीय वगैरे प्रकारचे असंख्य वर्ग करणे जरूरीचे पडेल. परंतु ते अवस्थित अतएव अशास्त्रीय होय.''[१७] येथे राजवाडे यांना कादंबरीतील अनुभवक्षेत्र कसे विस्तारणारे आहे हे सुचवायचे आहे. परंतु अनुभवाचे स्वरूप जर इतिहासातून धुमारलेले असेल, तर तो अनुभव विशिष्ट स्थल-काल व

परिणाम यांनी युक्त असतो. म्हणूनच त्याच्या अभिव्यक्तीचे स्वरूपही त्याच्याशी जुळणारे असते. या अर्थाने ऐतिहासिक कादंबरी हा कादंबरीचा एक वेगळा प्रकार मानावा लागतो.

''ऐतिहासिक कादंबरी लेखकाच्या कालापेक्षा भिन्न असे भूतकालीन जीवन व वातावरण साकार करण्याचा प्रयत्न करते'' असे बुचनने म्हटले आहे. बुचनच्या या व्याख्येतून दोन गोष्टी स्पष्ट होतात. पहिली अशी की, लेखकाने आपल्या काळाशी-वर्तमानकाळाशी-संबद्ध नसलेल्या सामाजिक व राजकीय परिस्थितीचे चित्रण जिच्यात केलेले असते, तिला ऐतिहासिक कादंबरी म्हणता येते. लेखक सुदूरच्या भूतकालीन घटना आणि व्यक्ती यांच्यावर कादंबरी लिहू शकेल, त्याचप्रमाणे अगदी नजीकच्याच भूतकाळातील युगप्रवर्तक घटना किंवा व्यक्तींवरही कादंबरी लिहू शकेल. दोन्ही प्रकारच्या कादंबऱ्यांचे यश हे त्यातील वैशिष्ट्यपूर्ण वास्तवाच्या चित्रणावर प्रामुख्याने अवलंबून असेल. ते वास्तव वर्तमानकालीन वाचकाच्या अनुभवाचे असणार नाही.

दुसरी गोष्ट अशी की, भूतकालीन वातावरण हे व्यक्ती किंवा घटना यांच्यापेक्षा महत्त्वाचे असल्याने निव्वळ काल्पनिक, म्हणजे दंतकथा, आख्यायिका स्वरूपाचे चित्रण झाले. वातावरण जिवंतपणे उठले की काम झाले. अशा ठिकाणी व्यक्ती व घटना काल्पनिक असूनही घटना तेथे असतील तर त्या कादंबरीतील ऐतिहासिकता आपोआपच महत्त्वाची बनेल.

ऐतिहासिक कादंबरीकार निर्मितीसाठी पुराव्याने सिद्ध झालेल्या ऐतिहासिक घटना आणि व्यक्ती यांचा आधार घेत असला तरी तो केवळ त्यांची नोंदणी करीत नसतो तर त्या आधारे आपल्या कल्पनेच्या साहाय्याने स्वतंत्र कथानकाची निर्मिती करतो.

''ऐतिहासिक कादंबरीमध्ये इतिहास व कथेच्या मूल्यांना आविष्करण लाभते. तिची उत्पत्ती आत्मविस्ताराच्या आंतरिक प्रेरणेने झालेली असते. म्हणूनच इतिहासाचा जीवनरस शोषून तरारलेली, बहरलेली भावसंपन्न कथा म्हणजे ऐतिहासिक कादंबरी''[१८] असे जान्हवी संत म्हणतात.

इतिहासातील ज्ञात घटना आणि व्यक्तीच्या पलीकडील अज्ञात भावस्पंदनांचा शोध कल्पनेच्या आधारे ऐतिहासिक कादंबरीकार घेत असतो. या अज्ञाताबद्दल लेखक आणि वाचक दोघांनाही उत्सुकता असते. लेखक हा शोध संभवनीयतेच्या कसोटीने ऐतिहासिक कादंबरीच्या निर्मितीतून पूर्णत्वाला नेत असतो. या संदर्भात डॉ. ल.म. भिंगारे म्हणतात, ''.... कादंबऱ्यांतील वाचकांना रमविणारा घटक कथात्मक आकर्षण हा ऐतिहासिक कथावस्तूत नसून इतिहासाला ज्ञात नसलेल्या किंवा फार तर ऐतिहासिक घटनेशी विरोधी नाही म्हणून संभवनीय म्हणता येईल, अशा काल्पनिक कथांत आहे.''[१९]

ऐतिहासिक कादंबरीची ही विविध वैशिष्ट्ये सांगणारी ऐतिहासिक कादंबरीची व्याख्या पुढीलप्रमाणे होईल - ''लेखकाच्या युगाच्या दूरकालीन युगातील भूतकालीन घटना, व्यक्ती आणि परिस्थितीच्या पुराव्याने सिद्ध झालेल्या ज्ञात निष्कर्षावर आधारित अशी तत्कालीन वातावरणाची पुनर्निर्मिती कलात्मक कल्पकतेच्याद्वारे ज्या कादंबरीत केलेली असते, ती ऐतिहासिक कादंबरी होय.'' प्रत्येक वाङ्मयप्रकाराची कलामूल्ये सारखी बदलत असतात. त्यामुळे कुठल्याही वाङ्मयप्रकाराला नेमक्या व्याख्येत बसविणे हे कठीण आणि अवघड काम आहे. ऐतिहासिक कादंबरीही याला अपवाद म्हणता येणार नाही.

**ऐतिहासिक कादंबरीचे स्वरूप :-**

ऐतिहासिक कादंबरी ही कलाकृती असल्यामुळे तिचे स्वरूप इतिहासासारखे ज्ञानबोधात्मक नसून कलात्मक असते. ऐतिहासिक कादंबरीकार भूतकालीन घटना व व्यक्ती यांचे पुररूज्जीवन करीत असतो. त्यामुळेच स्थूल ऐतिहासिक सत्यापासून तो काहीसा दूर राहू शकतो. परंतु ऐतिहासिक वास्तवापासून मात्र त्यास दूर राहता येत नाही. कादंबरी वाचत असताना क्षणभर वाचकाला भूतकाळात जाऊन आल्याचे जे समाधान मिळते ते त्यातील ऐतिहासिक वास्तवाच्या जिवंत आणि उत्कट चित्रणामुळेच लाभू शकते. ''ऐतिहासिक कांदबरीकराला इतिहासाने नोंदलेल्या व्यक्ती आणि घटना यांच्या अवशेषाच्या आधारावर

त्या व्यक्ती व घटना यांच्याशी संबद्ध अशा एका अर्थपूर्ण अनुभवाची इमारत रचावयाची असते.''[२०] कादंबरीकाराने निर्मिलेली ही अनुभववास्तु स्वतंत्र, वैशिष्ट्यपूर्ण अशी एक नवनिर्मिती असते. तिचा मूलाधार जरी सत्य ऐतिहासिक घटना, व्यक्ती हाच असला तरी त्या सत्यात कल्पनेने निर्मिलेले कितीतरी शक्य व संभवनीय प्रसंग बेमालूमपणे मिसळलेले असतात. मूळ घटनांचे संदर्भ बदलल्यामुळे त्यांना वैशिष्ट्यपूर्ण कलात्मक नवे रूप प्राप्त झालेले असते. या स्वतंत्र अनुभूतीची जशीच्या तशी प्रतीती करून देण्याचे कार्य श्रेष्ठ प्रतिभावंत करू शकतो.

ऐतिहासिक कादंबरीच्या वाचनाने भूतकालीन वास्तवाची साक्षात प्रतीती रसिकांस येते. उलट इतिहास वाचत असताना आपण वर्तमानकाळात वावरत असून भूतकालीन वातावरणाचे ज्ञान मिळवित आहोत असे वाचकाला वाटत असते. म्हणूनच मग ऐतिहासिक कादंबरीतील ऐतिहासिक वास्तवाचे स्वतंत्रपणे महत्त्व लक्षात घेतले पाहिजे. योग्य ऐतिहासिक वातावरणामुळे ऐतिहासिक तत्त्वे पोषक होत असतात. कित्येकदा ऐतिहासिक कादंबरीकाराने ऐतिहासिक वातावरणाच्या आधारे पोसलेला खोटा इतिहास खऱ्या इतिहासापेक्षा अधिक लोकप्रिय होतो. म्हणूनच नरहर कुरूंदकर म्हणतात - ''ऐतिहासिक कादंबरीत मुख्य घटना, मुख्य पात्रे किंवा काही पात्रे व घटना ऐतिहासिक असून चालत नाही. ती कादंबरी ऐतिहासिक वास्तवाच्या कलात्मक आकलनावर आधारलेली असावी लागते आणि हे आकलन ज्या वर्तमानकालीन वाचकासाठी असते, त्यांना ते समाधानकारक वाटावे लागते.''[२१] वाचकाला भूतकालीन वास्तव केव्हा समाधानकारक वाटते ? तर जेव्हा हे वास्तव समकालीन वास्तवाहून भिन्न असल्याचा साक्षात प्रत्यय त्यास येतो आणि त्या वास्तवात त्याला काही शाश्वत मानवी मूल्यांचे दर्शन घडते. कोणत्याही ललित साहित्याचा लेखक अशा शाश्वत मूल्यांच्या शोधाची व मांडणीची धडपड आपल्या कलाकृतीद्वारे करीतच असतो.

''कलाकृती वास्तवदर्शी ठरावयाची असेल तर तिचा वास्तवाशी विशिष्ट प्रकारचा संबंध असावयास हवा. विधान खरे ठरण्यासाठी त्यात वर्णन केलेली वस्तुस्थिती त्या

वर्णनाप्रमाणे खरोखर असणे आवश्यक असते. हा संबंध कलाकृती व वास्तव यांच्यातही असणे जरूर आहे. याचा अर्थ असा की, आधी ती कलाकृती वास्तवासारखी असायला हवी. शिवाय वास्तवातल्या घटना नुसत्या आहेत तशा टिपल्यामुळे सत्य हाती लागणार नाही. त्यासाठी त्या घटनांच्या पलीकडे जाऊन नियमिततेचे तत्त्व शोधले पाहिजे. विशिष्ट गोष्टी या विशिष्ट गोष्टी म्हणून महत्त्वाच्या नाहीत, त्यामागील नियमितता महत्त्वाची आहे.''[२२] अशाप्रकारे शाश्वत मूल्यांचा शोध घेणारी, मानवी जीवनातील नियमितता दाखविणारी कलाकृतीच श्रेष्ठ कलाकृती मानली जाते. अशा कलाकृतीमध्ये कलावंताला प्रतीत झालेले भूतकालीन वास्तवाचे पदर निर्व्याजपणे मोकळे होऊन सुस्पष्टपणे अभिव्यक्त झालेले असतात. अंत:प्रेरणेनेच त्याला त्या वास्तवाचा गाभा गवसलेला असतो. कलावंताची मन:पूर्वकता, ऋजुता त्याच्याशी संबंधित असते. त्यामुळे एकप्रकारची स्वाभाविकता आणि परिणामकारकता या भूतकालीन वास्तवात आलेली असते.

रा.ग. जाधव यांच्या मते, ''ऐतिहासिक वास्तव हे आजच्या वास्तवाइतकेच विराट आणि गुंतागुंतीचे असते. या वास्तवाचे आपल्या प्रकृतीनुसार अर्थ लावण्याचे आणि कुवतीनुसार त्याची अभिव्यक्ती करण्याचे स्वातंत्र्य लेखकाला आहे. किंबहुना त्या ऐतिहासिक वास्तवालाच आकार देण्याची आणि अर्थ शोधून काढण्याची संधी लेखकाला आहे.''[२३]

श्रेष्ठ प्रतिभावंतांनी अशी कितीतरी वेगवेगळी, नानाविध प्रकारची वैशिष्ट्यपूर्ण आकारचित्रे एकाच कालखंडातील ऐतिहासिक वास्तवातून शोधलेली दिसतात. प्रत्येक शोध नाविन्यपूर्ण, स्वतंत्र आणि मोहक आहे. एका शिवकालाच्या ऐतिहासिक वास्तवावर आधारीत हरिभाऊ आपटे, नाथमाधव, वि.वा. हडप, गो.नी. दांडेकर, रणजित देसाई यांच्या कादंबऱ्या वेगवेगळ्या प्रकारच्या आहेत.

**ऐतिहासिक कादंबरीच्या प्रेरणा :-**

''एखाद्या विशिष्ट कालखंडात विशिष्ट वाङ्मयीन प्रवृत्ती प्रभावी ठरतात. त्याच्या निर्मितीमागील जीवनाच्या प्रेरणा लक्षात घेणे म्हणजे तिच्यामधील सांस्कृतिक संदर्भ स्पष्ट करणे होय. हा सांस्कृतिक संदर्भ स्पष्ट करणे आवश्यक ठरते. याचे कारण प्रत्यक्ष वाङ्मयनिर्मितीची जी रीती असते, त्या रीतीचे (Practice) काही एक तात्त्विक निष्कर्षण केल्यास किंवा औपपत्तिक विश्लेषण केल्यास ती सबंध रीती अधिक चांगल्या प्रकारे समजू शकते.''[२४] एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरकालात ऐतिहासिक कादंबरीनिर्मितीची जी प्रवृत्ती निर्माण झाली त्या निर्मितीच्या तत्कालीन प्रेरणा समजून घेणे अगत्याचे आहे. या कालखंडातील ऐतिहासिक कादंबरीच्या निर्मितीप्रेरणा ह्या कादंबरीकारांच्या निवेदनांवरून समजू शकतील. तशाच विचारवंतांच्या मतावरूनही घेता येतील :-

१) **कादंबरीकारांची निवेदने :-**

''ह्या कोतवालाच्या कारकीर्दीचे संबंधाने .... लोकांचे मनोरंजनार्थ व उपदेशार्थ या गोष्टी लिहिल्या आहेत. प्रत्येक गोष्टीचे तात्पर्य काय याचा विचार करून ग्रंथ वाचला असता या कोतवालाचे वेळेस किती अंदाधुंदी होती व विद्वान म्हणविणारे लोकास देहाभिमान व जात्याभिमान मोठा असून त्यांचा नीतीमार्ग किती अशुद्ध व साधारण विषयाविषयी केवढे अज्ञान होते हे सहज कळून येईल.''[२५]

''ऐतिहासिक कादंबरीच्या धर्तीवर लिहिलेले रसाळ चरित्र सर्वांनी वाचावे, त्यातील मर्म ध्यानात आणावे, त्यापासून सद्बोध घ्यावा व आपले व आपल्या देशाचे हित साधावे अशी ग्रंथकर्त्यांची मनापासून इच्छा आहे.''[२६]

वरील निवेदनावरून लेखकांच्या दोन प्रमुख निर्मितीप्रेरणा आपल्याला समजतात. एक म्हणजे वाचकांचे मनोरंजन करण्याची आणि दुसरी नीतिबोध किंवा समुपदेश करण्याची होय.

२) **तत्कालीन सामाजिक परिस्थितीचा परिणाम :-**

या काळातील विद्वानांना भारतीय संस्कृतीचे श्रेष्ठत्व ठासून मांडावे, तिच्या गतिमान विकासासाठी स्फूर्तीदायी प्रेरणा निर्माण कराव्या असे तीव्रपणे वाटत होते. यासाठी लेखन करणाऱ्या वि.ज. कीर्तने, विष्णुशास्त्री चिपळूणकर, लक्ष्मणशास्त्री हळबे, रा.भि. गुंजीकर या विद्वानांचा उल्लेख केलाच पाहिजे. मराठेशाहीतील वैभवशाली इतिहास अतिशय परिश्रमपूर्वक जाणून घेण्याचा प्रयत्न त्यांनी केला. या इतिहासाच्या ज्ञानात मनोरंजनासाठी कल्पकतेची भर घालून रोचक आणि रंजक अशी ऐतिहासिक कादंबरी लिहून यातील काही मंडळींनी राष्ट्रीय जीवनाच्या उभारणीसाठी समाजात चैतन्य निर्माण करण्याचा प्रयत्न केला. याचाच अर्थ असा की, या ऐतिहासिक कादंबरीकारांच्या समकालीन वास्तवामध्ये जे विचारमंथन चालू होते, त्याचा नकळत परिणाम त्यांच्या वाङ्मयकृतींवर झालेला दिसतो. म्हणूनच या काळातील ऐतिहासिक कादंबरीच्या निर्मितीची प्रेरणा निव्वळ वाङ्मयीन नव्हती असे म्हणता येईल.

३) **परभाषेतील वाङ्मयाचा परिणाम :-**

या काळातील ऐतिहासिक कादंबरीच्या निर्मितीची प्रेरणा निव्वळ वाङ्मयीन नव्हती असे म्हणण्याचे आणखी एक कारण असे की, या लेखकांना 'कादंबरी' हा स्वतंत्र वाङ्मयप्रकार आणि त्याची घटक वैशिष्ट्ये व रचनातंत्र अल्पांशाने माहीत असावे असे वाटते. पाश्चात्य वाङ्मयाच्या अभ्यासामुळे ऐतद्देशीय वाङ्मयापेक्षा हे वाङ्मय थोडेसे वेगळे असल्याची जाणीव होत होती आणि जे मराठी भाषेत नाही ते आपण नव्याने रूजवावे असे वाटत होते. ना.वि. बापट आपल्या कादंबरीच्या प्रस्तावनेत लिहितात - "इंग्लिश, फ्रेंच, जर्मनी इ. पाश्चात्य भाषांत ऐतिहासिक कादंबऱ्या व कथानके (Historical Novels and Romances) लिहिलेली पुष्कळ पाहण्यात येतात .... त्याच धर्तीवर या पुस्तकाची काहीशी मांडणी केली आहे."[२७]

याचाच अर्थ पाश्चात्य वाङ्मयाच्या अभ्यासाने जे नवे वाङ्मयप्रकार समजले ते हाताळावे अशी नावीन्याची हौस व देशोन्नतीची ओढ या मंडळीच्या ठिकाणी होती.

**४) रचनापद्धती : संवादाचा वापर :-**

या काळातील ऐतिहासिक कादंबरीकारांना कादंबरी लेखनतंत्राचे पुरेसे आकलन झालेले नसल्यामुळे या सर्वच कादंबऱ्यांतून प्रसंगचित्रणामध्ये संवादाचा अतिरिक्त वापर आढळतो. पानेच्या पाने नाटकातल्यासारख्या संवादांनी व्यापलेली आहेत. संवाद लिहिण्याची पद्धतीदेखील नाटकसदृश्यच आहे. संवादाद्वारे प्रसंगचित्रण करण्याच्या या पद्धतीमुळे कथानकांची एकसंघ सलगता कमी झालेली आहे. व्यक्तींच्या तोंडून घटनांचे कितपत निवेदन करायचे याचेही तारतम्य काही ठिकाणी सांभाळले गेलेले नाही. त्यामुळे घटनेचे निवेदन करणारी पात्रे दोन दोन बोलतच राहतात. उदा. छत्रपती संभाजी महाराज कादंबरी पृष्ठ क्र. २८ वरील शिवाजी महाराजांचे बालणे हे अशाच प्रकारचे आहे.

स्त्री-पुरूष, हिंदू-मुसलमान असा व्यक्तिपरत्वे भेद करून अनुरूप भाषेचा वापर संवादात केलेला आहे. त्यामुळे काही संवाद पूर्ण हिंदीत तर काही हिंदी-मराठी मिश्र स्वरूपात आढळतात.

**५) कलात्मकतेतील उणीव :-**

या ऐतिहासिक कादंबऱ्यांच्या कलात्मकतेस बाधा आणणारी आणि म्हणूनच खटकणारी आणखी एक गोष्ट म्हणजे यातील माहितीपर निवेदने. बाजीरावाने पेशवा झाल्यावर पुण्यास शनिवारवाडा बांधला हे सांगितल्यावर त्या वाड्याची लांबी-रूंदी, रचनापद्धती, परिसर व इत्यंभूत वर्णन येते. कादंबऱ्यांतून येणारी ही वर्णने शालेय क्रमिक पुस्तकात शोभतील अशी असल्यामुळे कादंबरी रूक्ष बनते. कथावस्तूमधील उत्कटता व जिवंतपणा कमी होतो याची जाणीव या कादंबरीकारांना नसावी. म्हणूनच अकलात्मक स्वरूपात ते आपला व्यासंग आणि आपले ज्ञान प्रकट करतात.

**६) बोधवादाचा पगडा :-**

या कादंबरीकारांची निर्मितीप्रेरणा बोधवादाची आहे. वास्तविक उद्‌बोधन हा ललित कलाकृतीचा आनुषंगिक परिणाम असतो. श्रेष्ठ ललितकृतींच्या कलात्मक परिणामामध्येच हे उद्‌बोधन सहजपणे सामावलेले असते. कादंबरीच्या वाचनाने वाचकाला जिज्ञासातृप्तीचे समाधान मिळून त्याच्या जाणिवेच्या कक्षा मोठ्या होतात व त्याच्या मनाचे उद्‌बोधन होते.

**७) गतकालाबद्दलची स्वाभाविक जिज्ञासा :-**

भूतकालीन मानवी जीवनाबद्दल वाटणारे कुतूहल ही माणसाची सहज, स्वाभाविक आणि मुख्य प्रेरणा असते. माणसाला भविष्याबद्दल जशी उत्सुकता वाटत असते. तशीच भूतकाळाबद्दल देखील वाटत असते. गौरवपूर्ण उज्ज्वल इतिहास अभ्यासणे, भूतकालीन महान वीर पुरूषतज्ञांच्यापासून स्फूर्ती घेणे, देशप्रेम बाळगणे हे माणसाला स्वाभाविकपणे आवडते. आपल्या पूर्वजांच्या जीवनपद्धती, त्यांचे रीतीरिवाज, आशाआकांक्षा, ध्येयधोरणे, कार्ये या सर्वांबद्दल माणसाला औत्सुक्य असतेच. भूतकाळ जाणल्याने भविष्यकाळाची यथायोग्य कल्पना करता येते आणि भविष्यकाळात जे काही करायचे ते आपल्या पूर्वपरंपरेशी सुसंगत, पूर्वजांच्या गौरवाला साजेसे असावे असेही त्याला वाटते. अशाप्रकारे ऐतिहासिक कादंबरीकारांची भूतकालीन वास्तव जिवंत करण्याची ही एक महत्त्वपूर्ण प्रेरणा म्हणता येईल.

**८) सामान्यांच्या मनात इतिहासाबद्दल आवड व अभिमान निर्माण करणे :-**

कादंबरीकारांची कल्पकता आणि कलात्मक रचनापद्धती वापरून इतिहासाला मनोरंजक व सुरस बनविता येते. तसेच कादंबरीच्या साहाय्याने इतिहासाला, इतिहासातील स्थूल प्रमाणभूत सत्याला, आकर्षक व सरस बनवून सर्वसामान्य माणसाला इतिहासाची गोडी लागावी असे काही लेखकांना वाटते. त्याचप्रमाणे सामान्यांना इतिहास समजावून देता देता त्यांच्या मनात इतिहासाबद्दल अभिमान जागृत करावा असेही काहींना वाटते. कॅप्टन बेलवलकर

यांनी - ''राष्ट्रपुरूषांच्या गौरवगाथा सांगून वाचकांच्या मनात इतिहासाविषयीचा अभिमान जागृत करणे.''[२८] ही आपली ऐतिहासिक कादंबरीची निर्मितीप्रेरणा असल्याचे सांगितले आहे.

**९) अज्ञात भावसत्याचा शोध :-**

ऐतिहासिक कादंबरीचा लेखक कादंबरीच्या माध्यमातून वाचकांपुढे इतिहास ठेवणे एवढ्याच मर्यादित हेतूने लेखनप्रवृत्त झालेला नसतो. रूढ वा विकृत इतिहासापेक्षा 'वेगळे' किंबहुना 'अधिक काही' म्हणजेच इतिहासातील ज्ञात घटनांच्या पलीकडील भावसत्य दाखविण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. ऐतिहासिक ज्ञात घटनांचा अभ्यास करताना जे नवे निराळे आकलन त्यास झालेले असते जे नावीण्यपूर्ण ऐतिहासिक तथ्य प्रतीत झालेले असते, ते सर्व भावरंगात भिजवून मांडण्याचा तो प्रयत्न करतो. त्यामुळेच एकाच कालखंडातील घटनांवर अथवा ऐतिहासिक व्यक्तींवर आधारलेल्या ऐतिहासिक कादंबरीचे स्वरूप भिन्न आढळते. उदा. 'पानिपतचे युद्ध' या घटनेवर आधारलेल्या 'दुर्दैवी रंगू', 'पानिपतची मोहीम', 'पानिपतची रणधुमाळी', 'पानिपत' या कादंबऱ्या अनेक बाबतीत परस्परभिन्न स्वरूपाच्या आहेत.

**१०) इतिहासप्रसिद्ध पुरातन वास्तूंचे दर्शन :-**

ऐतिहासिक कादंबरीची लेखनप्रेरणा केवळ इतिहासच नसते, तर भूगोलदेखील असते असेही म्हणता येईल. कारण भूतकाळाबद्दल विशेष आस्था असणाऱ्या, इतिहासाबद्दल प्रेम असणाऱ्या कलावंताला जुन्या ऐतिहासिक वास्तूंचे अवशेष, प्राचीन किल्ले, गड, तट इत्यादी पाहताना त्यांच्यात लपलेला इतिहास दिसतो आणि तो उघड करण्याची तीव्र इच्छा त्याच्या मनात निर्माण होते. म्हणजेच ऐतिहासिक कादंबरीकार एका रोमांचकारी आवडीने लेखनप्रवृत्त होत असतो. गो.नी. दांडेकरांचे निसर्गप्रेम, किल्ले, तट, डोंगरदऱ्यांतील भटकंती ही त्यांच्या ऐतिहासिक कादंबरीची निर्मितीप्रेरणा आहे.

**११) समकालीन वास्तव बदलण्याची मनीषा :-**

काही ऐतिहासिक कादंबरीकार समाजमनातील ऐतिहासिक महान व्यक्तींबद्दलच्या श्रद्धेचा उपयोग करून घेऊन जनजागृती करू इच्छितात. देशभक्ती, स्वातंत्र्यप्रीती यासारख्या भावनांनी प्रेरित होऊन ऐतिहासिक कादंबरीद्वारे वर्तमानाचे यथार्थ रूप दाखविण्याचा प्रयत्न ते करतात. देश जेव्हा पारतंत्र्यात असतो तेव्हा परकीय सत्तेने केलेला अन्याय, पारतंत्र्यात व्यक्तिविकासाची आणि समाजविकासाची होणारी एखादी अदृश्य घटना निवडून ते दाखवितात आणि त्याद्वारे लोकांच्या मनात स्वातंत्र्यप्रेम जागृत करण्याचा आणि परकीय सत्तेविरूद्ध संघर्ष करण्याची मनीषा निर्माण कण्याचा प्रयत्न करतात.

**१२) समाजाच्या अभिरूचीत झालेला बदल :-**

वर्तमानातील समाजाची अभिरूची बदलली की निर्मितीमध्ये तद्नुरूप बदल होतात. ‘‘कल्पनारम्य कादंबऱ्यांचा वीट आल्यावर पुन्हा ऐतिहासिक कादंबरी वाचकांना आवडू लागली. काही प्रमाणात हा चित्रपटसृष्टीचा प्रभाव म्हणावा लागेल.’’[२९] असे ऐतिहासिक कादंबरीच्या निर्मितीची मीमांसा करताना ल.ग. जोग यांनी म्हटले आहे. अभिरूचीच्या बदलामागे माणसाची नावीन्याची आवड आहे.

**१३) वर्तमानातील सामाजिक व राजकीय परिस्थितीतील बदल :-**

समाजाच्या परिवर्तन प्रक्रियेचा भाग म्हणून अथवा सत्ताधीशांचा भिन्न संस्कृतीशी संपर्क आल्यामुळे अनेकवेळा सामाजिक व राजकीय परिस्थितीत बदल घडून येतो. नव्या तत्त्वप्रणाली, विचारप्रणाली उदयास येऊ लागतात व त्याचवेळी जुन्या ऐतिहासिक घटनांना उजाळा मिळतो. ‘‘अठराशे सत्तावनाच्या स्वातंत्र्ययुद्धाचा शतसांवत्सरिक उत्सव ही सुरूवातीच्या ऐतिहासिक कादंबरी लेखनामागील प्रेरणा असू शकतो.’’[३०] असे बापट-गोडबोले म्हणतात.

**१४) आदर्श व्यक्ती, आदर्श मूल्ये आणि अभिजात वृत्तीची आवड :-**

कित्येकदा वर्तमानकालीन वास्तवामध्ये सामाजिक जीवनमूल्ये, नीतिमूल्ये आढळेनाशी झाली की मग त्या मूल्यांच्या स्थापनेसाठी लेखकांकडून प्रयत्न सुरू होतात. एकेकाळी आदर्श व्यक्तींनी समाजाला कसे भारावून टाकले होते हे सांगावेसे वाटू लागते. चरित्रात्मक ऐतिहासिक कादंबऱ्यांची ही महत्त्वाची प्रेरणा होऊ शकते.

आजच्या ऐतिहासिक कादंबरीकारांनी परंपरा जोपासून वाढीला लावण्यासाठी कादंबरीलेखन केले आहे असे रा.ग. जाधव सुचवितात. त्यांच्या मते, आजच्या नायकप्रधान म्हणजेच चरित्रात्मक कादंबऱ्या आदर्श मानवी मूल्ये दाखवितात. त्याचप्रमाणे या महान कर्तृत्ववान आदर्श व्यक्तींच्या ठिकाणी जरी अद्वितीय दैवी गुणधर्म असले तरी ती सुद्धा माणसेच कशी होती हेही या कादंबरीकारांनी दाखविले आहे. म्हणून या सर्व गोष्टींमुळेच ऐतिहासिक कादंबरी वाचकांच्या आकर्षणाचा विषय बनलेली आहे.

## संदर्भसूची

१) बापट प्र.वा., गोडबोले ना.वा.-मराठी कादंबरी (तंत्र आणि विकास), व्हीनस प्रकाशन, पुणे ४११०३०, तिसरी आवृत्ती, १९७३ सु.आ.पृ. ३६.

२) तत्रैव, पृ.क्र. ३७.

३) तत्रैव, पृ. क्र. ३७.

४) तत्रैव, पृ. क्र. ३७.

५) संत (प्रा.) जान्हवी-कादंबरी एक वाङ्मय प्रकार, मोघे प्रकाशन, कोल्हापूर २, प्रथम आवृत्ती, १९७१, पृ. क्र. ९.

६) तत्रैव पृ. क्र. १३.

७) तत्रैव पृ. क्र. १०.

८) तत्रैव पृ. क्र. १४.

९) कुलकर्णी मदन - मराठी प्रादेशिक कादंबरी (तंत्र आणि विकास), श्री. मंगेश प्रकाशन, रामदास पेठ, आवृत्ती पहिली १९८४, नागपूर २, पृ. क्र. २, ८७.

१०) बापट प्र.वा. आणि गोडबोले ना.वा., उनि, सप्टेंबर १९७३ पृ. क्र. ३०, ३७, ३५.

११) फडके ना.सी.-प्रतिभा साधन, अंजली प्रकाशन, पुणे, आवृत्ती आठवी, १९६३, पृ.क्र. ९५.

१२) प्रिस्टले जे.बी. - केतकरी कादंबरी (दुर्गा भागवत), मौज प्रकाशन गृह. मुंबई, आवृत्ती पहिली, १९६७, पृ.क्र. ७.

१३) देशपांडे कुसुमावती-मराठी कादंबरीचे पहिले शतक, मुंबई मराठी साहित्य संघ, आवृत्ती दुसरी, १९७५, पृ.क्र. १६.

१४) गाडगीळ गंगाधर-साहित्याचे मानदंड, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, आवृत्ती पहिली, १९६२, पृ.क्र. २०७.

१५) नेमाडे भालचंद्र-टीकास्वयंवर, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, आवृत्ती पहिली, १९९०, पृ.क्र. १९८.

१६) कुलकर्णी श्री.मा.-कादंबरीची रचना, उन्मेष प्रकाशन, नागपूर, आवृत्ती पहिली, १९५६, पृ.क्र. १५.

१७) राजवाडे वि.का.-लेखसंग्रह, साहित्य अकादमी, नवी दिल्ली, १९३८, संपादक- लक्ष्मणशास्त्री जोशी, पृ.क्र. २९३.

१८) संत (प्रा. ) जान्हवी-चरित्र, इतिहास आणि ऐतिहासिक कादंबरी, आलोचना, मार्च १९७१, पृ.क्र. २३.

१९) भिंगारे ल.म.-हरिभाऊ, मोघे प्रकाशन, कोल्हापूर, १९५६, पृ.क्र ३१८.

२०) कुलकर्णी वा.ल.-वाङ्मयीन टीपा आणि टिप्पणी, पॉप्युलर प्रकाशन, १९७५, साहित्य आणि इतिहास, पृ.क्र. ६१.

२१) कुरूंदकर नरहर-धार आणि काठ, देशमुख आणि कंपनी, १९७१, पृ.क्र. २२१.

२२) पाटणकर रा.भा.-सौंदर्यमीमांसा, पृ.क्र. ३५५.

२३) जाधव रा.ग.-वाङ्मयीन आकलन, पॉप्युलर प्रकाशन, पुणे १९७७, पृ.क्र. २५.

२४) जाधव रा.ग.-नववाङ्मयीन प्रवृत्ती व प्रमेये, कॉन्टिनेंटल, पुणे १९७२, पृ.क्र. १५५.

२५) विजयकर मोरोबा कान्होबा-घाशीराम कोतवाल, प्रस्तावना, मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय, १९८३, द्वितीय आवृत्ती, १९६१, पृ.क्र. २.

२६) बापट नागेश विनायक-श्रीमंत बाजीराव बल्लाळ उर्फ बाजीराव पेशवे, तृतीय आवृत्ती, १९८०, प्रस्तावना, पृ.क्र. १.

२७) बापट ना.वि.-छत्रपती संभाजी महाराज, प्रथम आवृत्ती, १८८४, प्रस्तावना, पृ.क्र. १.

२८) वेलवलकर कॅप्टन-शर्थीनं राज्य राखलं, मॅजेस्टिक, १९६९, प्रस्तावना.

२९) जोग ल.ग.-मराठी कादंबरी, पृ.क्र. १३.

३०) बापट प्र.वा. व गोडबोले. ना.वा., उनि, पृ.क्र. १६७.